**अल्पसंख्यांकांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती - केंद्रशासन पुरस्कृत योजना**

**आकस्मिकता निधीतून अग्रिम मंजूरी.**

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

क्रमांक- संकीर्ण- सीएस २००८/ (९५/०८) मशि-६

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ० ३२.

दिनांक. १० एप्रिल, २००८

**संदर्भ-**१.उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक -संकीर्ण-२००७ / ५४२/०७, तांशि-१, दिनांक २१.१.२००८ व दिनांक २७.१.२००८

२. केंद्र शासन अल्पसंख्याक कार्यालय, मंत्रालय यांचे क्रमांक ५/११/२००८ पीटी ( पीपीआर ), दिनांक २८.३.२००८ चे पत्र.

**प्रस्तावना-** केंद्र शासनाच्या अल्प संख्याक कार्य मंत्रालयाने, अल्पसंख्याक समुदायाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी चालू शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून अल्पसंख्यांक समाजातील विदयार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती योजना ( **Post - Matric Scholarship Scheme** ) सुरु केली आहे. त्यास उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण- २००७/ ५४२/०७/ तांशि-१, दिनांक २१.१.२००८ व दिनांक २७.१.२००८ अन्वये महाराष्ट्रात लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला.

**शासन निर्णय:** सदर शासन निर्णयान्वये शिष्यवृत्ती योजनेकरिता खाली दर्शविल्याप्रमाणे आकस्मिकता निधीतून, अग्रिम केंद्र शासनाने विहित केलेल्या अटींच्या अधीन राहून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | योजनेचे नांव | रक्कम | | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| | | शिष्यवृत्ती | प्रशासकीय खर्च | |
| १ | मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना | २,२०,९५,७००/- | १,५६,०००/- | संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे |
| | एकूण- | २,२२,५१,७०० /- | | |

2. उपरोक्त योजनेकरिता वरील तपशिलाप्रमाणे अंतर्भूत असलेला खर्च **रुपये २,२२,५१,७००/- (रुपये दोन कोटी बावीस लक्ष एक्कावन्न हजार सातशे फक्त** ) सुरुवातीला शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि ११.०८/२/अर्थसंकल्प ८, दिनांक ९/४/२००८ संगणक सांकेतांक क्र ८०००-३६४-१ अन्वये आकस्मिकता निधीच्या अग्रिमातून भागविण्यांत यावा व त्याची पूर्तता पुरवणी मागणीद्वारे तरतुद झाल्यानंतर पुढील लेखाशिर्षाखाली दर्शवून करण्यात यावी.

| | योजनेचे नांव | लेखाशिर्ष | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| २ | मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना | २२०२- सर्वसाधारण शिक्षण<br>०३ - विद्यापीठीय व उच्च शिक्षण,<br>१०७- शिष्यवृत्त्या<br>(०२) (०३) अल्पसंख्याकांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना<br>( १०० % केंद्र शासन पुरस्कृत योजना )<br>( २२०२-ई -७७-८) | संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे |

३ संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिका-यांकडे सदरील रक्कम सुपुर्द करण्यासंबंधीच्या आदेशात/प्रपत्रात आगाऊ रकमेतून खर्च करताना सादर करण्यांत येणा-या देयकांवर आकस्मिकता निधी अग्रिम शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि ११.०८/२/अर्थसंकल्प ८, दिनांक ९/४/२००८ संगणक सांकेतांक क्रमांक ८०००-३६४-१ असे लाल शाईने लिहावे अशी स्पष्ट सूचना त्या आदेशात/पत्रात अंतर्भूत करावी ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

४. मंजूर अग्रीम रकमेतून प्रत्यक्ष खर्ची पडलेल्या रकमेबाबतचा सविस्तर अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास तात्काळ सादर करावा.

५. संबंधित खर्च हा आकस्मिकता अग्रीमातून खर्ची पडणार असल्यामुळे महाराष्ट्र आकस्मिकता निधी नियमावलीतील तरतुदीनुसार देयके सादर करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) आकस्मिकता निधीतून करण्यांत येणा-या खर्चासंबंधीच्या प्रत्येक प्रमाणकावर तांबडया शाईने आकस्मिकता निधीतून अशी नोंद घेण्यांत यावी.

२) जर आकस्मिकता निधीतून मंजूर झालेली रक्कम पूर्ण खर्च होणार नसेल तर अग्रीम रक्कम कमी करण्यासाठी शासनाकडे वेळीच प्रस्ताव सादर करावा.

३) आकस्मिकता निधीतून खर्च करण्यात येणा-या रकमेचा सतत मेळ घालण्यांत यावा.

४) आकस्मिकता निधीतून केलेल्या खर्चासाठी काढावयाची रक्कम वेगळी बिले पाठवून काढावी.

५) अशा प्रत्येक बिलावर व प्रतीपत्रावर वित्त विभागाने ज्या शासकीय ज्ञापनाद्वारे अग्रीम मंजूर केले आहे त्याचा क्रमांक व दिनांक नमूद करावा.

६) बिलासोबत पाठविलेल्या स्लिपवर लेखाशिर्ष कोड नंबर व खर्चाचा कोड नमूद करावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारिक संदर्भ क्र. १९४/२००८/व्यय-५, दिनांक ३१/३/२००८ निर्गमित करण्यात येत आहे.

५ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००८०४१०१८४४३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु. बा. तुंबारे )

कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण .

महालेखापाल (लेखा व परीक्षा) महाराष्ट्र १/२ ,मुंबई/नागपूर

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला. मुंबई ३२.

वित्त विभाग कार्यासन क्र. व्यय-५, अर्थसंकल्प ६, अर्थसंकल्प ३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

निवडनस्ती मशि-६